प्रेस नोट दिनांक. ३०/०१/२०२४

**आरोपी सरफराज सरदार पठाण , पद सर्व्हेयर (बाहयस्त्रोत कंत्राटी), नगर परिषद,गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी ५०००/- रूपयांची लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांचे जाळयात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, परभणी |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.गंगाखेड,जि. परभणी गु.र.न. ४१ /२०२४<br>कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | सरफराज सरदार पठाण , वय ३० वर्षे, पद सर्व्हेयर (बाहयस्त्रोत कंत्राटी), नगर परिषद,गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी राहणार बनवाडी पोस्ट वडगाव स्टेशन ता. सोनपेठ जि.परभणी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रू. |
| लाचेची स्विकारली रक्कम | ५,०००/- रू. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे नावे गजानन नगरी गंगाखेड येथील जागेवर प्रधानमंत्री नागरी आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे.त्याचा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे. त्यानंतर बाकीचे हप्ते कधी मिळतात याबाबत विचारणा करण्यासाठी तक्रारदार हे नगरपरिषद गंगाखेड येथे गेले असता तेथील सर्व्हेयर सरफराज पठाण यांनी तक्रारदार यांना तुमच्या घराचे जिओ टॅगिंग चे काम केल्याने तुम्हाला साठ हजार रुपयाचा दुसरा हप्ता तुमच्या खात्यावर पडणार आहे.घरकुलाचे उर्वरित अनुदानासाठी जिओ टॅगिंग चे काम करून अनुदानाची रक्कम तुमच्या खात्यावर जमा करणे कामी मला पाच हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली.<br>घरकुलाचे अनुदानाचा दुसरा हप्ता जमा झाल्यानंतर दिनांक २९/०१/२०२४ रोजी तक्रारदार यांना यातील आरोपी यांनी तुमच्या बँक खात्यात अनुदानाचा दुसरा हप्ता जमा झाला आहे, तुम्हाला यापूर्वी सांगितल्या प्रमाणे मला येऊन भेटा असे फोनवर कळविले. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ३०/०१/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान यातील आरोपी यांनी तक्रारदार यांना त्यांचे घरकुलाचे जिओ टॅगिंग आणि उर्वरित अनुदानाच्या हप्त्याचे काम करण्यासाठी ५०००/- रु रक्कमेची लाचमागणी केली.<br>सापळा कार्यवाही दरम्यान यातील आरोपीने पंचासमक्ष ५०००/- रु लाचेची रक्कम स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल आहे. |
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही डॉ.राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.रमेशकुमार स्वामी, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड परिक्षेत्र,नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी चे श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक, श्री.बसवेश्वर जकिकोरे,पोलीस निरीक्षक, पोह/निलपत्रेवार, पोशि/कदम, पोशि/मो.जिब्राईल शेख, चापोह/कदम यांनी पार पाडली. |
| तपास अधिकारी | श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि युनिट परभणी. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक :- 02452-220597<br>टोल फ्री क्रमांक:- 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन<br>acbmaharastra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उप अधीक्षक 9850483337 |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Instagram : acbparbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner